# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 01/11/2022 (मंगळवार)

---

## सरकारी कामात अडथळा करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**१) पो.स्टे. पारशिवनी** :– दिनांक ०४/०८/२०२० चे १९.४५ वा. दरम्यान फिर्यादी नामे– रामकिसन आभा सदगर, वय २९ वर्ष, कार्यालयीन अधिक्षक नगर पंचायत पारशिवनी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. पारशिवनी येथे अप. क्र. २१३/२०२० कलम ३५३, १८८, २६९, ५०४, ५०६ भादवि. सहकलम ०३ महामारी रो. प्रति. कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक ०४/०८/२०२० चे १९.४५ वा. फिर्यादी हे नगर पंचायतचे कर्मचारी सहा. प्रभाग क्र. १३ येथे कंटोमेंट झोन तयार करणे करीता गेले असता आरोपी नामे–लिलाधर पंजाबराव कवडे, वय ३४ वर्ष, रा. पातीमाता मंदिर तेलीपुरा वार्ड क्र. ०३ पारशिवनी याने नगरपंचायत कर्मचाऱ्यांना बॅरिकेट बांधण्यास अडथळा निर्माण करून त्यांना शिवीगाळ करून मारण्याची धमकी देवून सरकारी कामात अडथळा निर्माण केला. अशा फिर्यादीच्या रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर प्रकरणाचे तपास पोलीस उपनिरीक्षक श्री. ज्ञानोबा पळनाटे पोस्टे पारशिवनी यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिंनाक ०१/११/२०२२ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. **पावसकर** यांनी वरील नमुद आरोपीला कलम ३५३, ५०४, ५०६ भादंवि मध्ये ०१ वर्ष सश्रम कारावास तसेच प्रत्येकी ५०००/–रू. दंड, दंड न भरल्यास ०६ महिने सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्री. नंदनवार यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन सफौ/६९० किशोर निंबाळकर, पोस्टे पारशिवनी यांनी मदत केली आहे.

## चोरी

**२) पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील धामनगाव शेत शिवार येथे दिनांक २८/१०/२०२२ चे १८.०० वा. व दिनांक २९/१०/२०२२ चे २१.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– निमीश ग्यानचंद जांबुळकर, वय २१ वर्ष, रा. बालाजी नगर, खात रोड भंडारा यांची विटाभट्टी असुन तसेच ते विटा भट्टीवरच राहत असल्याने दिनांक २८/१०/२०२२ चे १६/०० वा. दरम्यान फिर्यादीचा मित्र याने विटाभट्टी येथील साहीत्याची पाहणी केली असता तेथील सर्व साहीत्य बरोबर होते परंतु दिनांक २९/१०/२०२२ रोजी फिर्यादीचा मित्र हा विटा भट्टी वर गेला असता, जुनी पॅन मिक्सर मोटार किमती ७,०००/– रू, २) जुनी केनवेटर बेल्ड मोटार किमती ८,०००/– रू, ०३) जुनी हायड्रोलिक ट्रोली किमती ९,०००/–रू., ०४) जुनी हायड्रोलिक प्रेस किमती १०,०००/– रू., ०५) हायड्रोलिक प्रेस ट्रे किमती ५,०००/–रू., ०६) जुनी आईल स्पायर मोटार किमती ७,०००/–रू., ०७) जुनी रिले मशिन किंमती ७,०००/– रू., ०८) लोहा ४.५ टन किमती ८,०००/–रू. असा एकुण किमती ६१,०००/– रूपयाचा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस स्टेशन मौदा करीत आहे.

## <u>रेती चोरी करणाऱ्या आरोपींवर कारवाई</u>

३) पो.स्टे. खापा :— अंतर्गत ०४ कि.मी. अंतरावर मौजा वाकोडी शिवार येथे दिनांक ३१/१०/२०२२ चे २२.५० वा. दरम्यान पोलीस स्टेशन खापा येथील स्टाफ हे पोलीस स्टेशन खापा हद्दीत कन्हान नदी परिसरात पेट्रोलिंग करीत असतांना त्यांना ट्रॅक्टर क्र. एम.एच.—४०/सी. एच—४६४५ तसेच नंबर नसलेल्या ट्रॉलीमध्ये अवैधरित्या रेती मिळुन आली. ट्रॅक्टर ट्रॉलीचा चालक आरोपी नामे— साकीर रमजान पठाण वय २३ वर्ष रा. वाकोडी ता. सावनेर याने ट्रॅक्टर ट्रॉली मध्ये विनापरवाना व अवैधरीत्या ०१ ब्रॉस शासकीय रेती किंमत ४,०००/— रु. कन्हान नदीतून भरुन चोरुन वाहतुक करतांना मिळुन आले.

आरोपीच्या ताब्यातुन ट्रॅक्टर व नंबर नसलेल्या ट्रॉलीची किंमत ४,००,०००/— रु. असा एकुण ४,०४,०००/— रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी खापा पोलीसांनी, पो.स्टे. खापा येथे आरोपीविरूद्ध कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला असुन ट्रॅक्टर चालक आरोपीस अटक करण्यात आलेली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन खापा करीत आहे.

## <u>**अनोळखी पुरूषाचा मृत्यू**</u>

**४) पो.स्टे. अरोली :—** अंतर्गत १५ कि. मी अंतरावरील मौजा घोटमुंडरी शिवारात रेवराल खात खंडचे मध्ये दिनांक ३१/१०/२०२२ चे ११.०० वा. च्या पुर्वी फिर्यादी नामे—सौरभ सुनिल वासनिक, वय २५ वर्ष रा. रेल्वे कॉलनी खात ता. मौदा यांनी दिलेल्या माहीतीवरून रेल्वे पटरी दुरूस्त डयुटीवर हजर असताना ११.०० वा. सुमारास प्यारेलाल भुते (मेट) यांनी फोनव्दारे माहिती दिली की, घोटमुंदरी शिवारात रेवराल खात मध्ये रेल्वे ट्रॅकचे बाजूला ''एक अनोळखी व्यक्ती पडलेला आहे. त्या ठीकाणी जाऊन चौकीदारी करा'' असे सांगीतल्याने फिर्यादीने लगेच त्या ठीकाणी जाऊन पाहणी केली असता एका अनोळखी पुरुषाचे प्रेत कोणत्यातरी धावत्या ट्रेनमधुन पडुन गंभीर जखमी होवुन मरण पावलेले असल्याने ते कुजलेल्या स्थितीत ट्रॅकचे बाजूला पडलेले दिसले.

**<u>मृतकाचे वर्णन—</u>**

एक अनोळखी पुरुष वय अंदाजे ३५ वर्षे, रंग सावळा, उंची ५.६ इंच खांदयापासुन डावा हात नसलेला, उजवा पाय पंजापासुन नसलेला, निळा जिन्स, काळया रंगाचा बेल्ट, कथ्या रंगाची अंडरवीयर, कुजलेल्या स्थीतीत, पोटाच्या उजव्या भागातुन अळया निघत असलेल्या, शरीरापासुन १० फुटावर डोक्याचे केस पडलेले, खिशात पासपास गुटख्याची पिवळया रंगाची पुडी मानेपासुन डोक्याचा नसलेला दिसत आहे.

याबाबत कुणीही ओळखत असल्यास कृपया पोलीस स्टेशन अरोली येथील सहायक पोलिस निरीक्षक श्री. राजेश जोशी मो.नं. 7875966678 या मोबाईल क्रमांकावर वर कृपया संपर्क साधावा.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. अरोली येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग दाखल केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस स्टेशन अरोली करीत आहे.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर